# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/02/2024 (बुधवार) दुपार


### फसवणुक करणाऱ्या आरोपीस केले नागपूर ग्रामीण पोलीसांनी अटक

फिर्यादी बाबा टाटांबर गुरु दुर्गानंद वय ७२ वर्ष रा छिंदवाडा रोड सावेनर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक २१/१०/२०२१ रोजी रीपोर्ट दिली की, आरोपी मेहेर बाळकृष्ण परतेकी, वय ४३ वर्ष रा. किल्लापुरा सावनेर यांनी नागपुर निधी लि. या नावाने सावनेर शहरात बले कॉम्पलेक्स मध्ये सन २०१८ ला वित्तीय संस्था स्थापन केली होती व त्यामध्ये आरोपी व ईतर सहा लोक काम पाहत होते सदर संस्था ही बँकीग सबंधी मुदत ठेवी ठेवने, दैनंदीन ठेवी जमा करणे, कर्ज वाटप करणे, ईत्यादी सर्व कामे करीत होती नमुद आरोपी यांचे वित्तीय संस्थाने ईतर बँकेपेक्षा जास्त व्याजासह कमी मुदतीत जास्त पैशाचा परतावा करण्याचे लोकांना प्रलोभन दाखवून पैसे जमा करुन ठेव पावत्या दिल्या होत्या लोकांनी मुदतीत त्याचे पैसे परत मागणी केली असता नमूद आरोपी हे त्यांची शाखा बंद करून पळून गेले. अशा व इतर स्वरुपाची तकार पोलीस स्टेशन येथे प्राप्त झाली. नमुद आरोपी व त्यांचे ईतर सहा आरोपी यांनी नागपुर निधी. लि. च्या नावाने सावनेर शाखेत लोकाचे पैसे ठेवी म्हणून स्विकारुन त्यांना मूळ रक्कम व व्याजासह पैशाचा परतावा न देता फिर्यादी व ईतर खाते दारांची अशी एकून २७,७०,०००/— रुपयांची फसवणुक करुन शाखा बंद करुन पळून गेले. सदर प्रकणात पोलीस स्टेशन सावनेर येथे अटक आरोपी व ईतर आरोपी यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचे तपासात आरोपी मेहेर बाळकृष्ण परतेकी, वय ४३ वर्ष, रा. किल्लापुरा सावनेर हा गुन्हा केल्यापासून फरार होता त्यास अटक करण्यात आली असुन गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता गुन्हा केल्याचे कबुली दिली.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, ठाणेदार मानकर सपोनि शरद भस्मे यांनी पार पाडली.

### नागपूर ग्रामीण पोलीसांनी केला रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

दि. १५/०१/२०२४ ते १५/०२/२०२४ रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह सुरू असुन आज रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह दरम्यान मा. पोलीस अधिक्षक साहेब, अपर पोलीस अधीक्षक साहेब, तसेच पोलीस उपअधीक्षक गृह मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पाटील सा. व सपोनी सोनेकर सा व काटोल बीट इंचार्ज Asi बहादुरे व कर्म यांच्या तर्फे कळमेश्वर येथील सेलु टोल नाका येथे ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर डॉक्टर काळे यांनी वाहन चालविणा—या चालकांची नेत्र तपासणी करण्यात आली तसेच पोलीस निरीक्षक पाटील साहेब यांनी वाहतुकी नियमाबाबत माहीती देवुन पॉम्पलेट वाटप करुन चिन्ह्याची माहीती देण्यात आली.

तसेच पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत मौजा सावळी येथे आदिवासी आश्रम शाळा सावळी मो. येथे रस्ता सुरक्षा सप्ताह संबंधाने मार्गदर्शन करण्यात आले. हेल्मेट आणि सीटबेल्ट, झेब्रा कासींगचा वापर करणे, वाहतूक विषयक नियम

व चिन्हे याबाबत माहिती दिली. श्रीकृष्ण विद्यालय खुर्सापार, गोमुख विद्यालय तिष्टी येथील अंदाजे १५० विदयार्थी विदयार्थीनीना मार्गदर्शन केले.









पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर